**पाहिजेत**

**ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत**

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

**संपर्क - 9923155996**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**शैक्षणिक**

**शासकीय कौशल्य विकास बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश**

इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, मोटर वाइंडिंग, ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन, टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, कम्प्यूटर ऑपरेटर, कम्प्यूटर पीसी मेंटेनेंस, एसी मैकेनिक, प्लंबर, फिटर, वेल्डर पात्रता 10 वी/ 12 वी पास / नापास कॉलेजचे विद्यार्थी, कामगार / कर्मचारी यांनाही प्रवेश ST पास ची, प्लेसमेंट ची, वायरमन लायसन ची सोय

पाटील इलेक्ट्रॉनिक इन्स्टिट्यूट, राधिका रोड, सातारा मोबाईल 9822097071 वर्ष ४० वे



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ०३ रा | बुधवार, दि. १५ जुलै २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# उजनीच्या पाण्यावर शासनाचे निर्बंध; शेतकरी अडचणीत!

## उजनी ५२% भरले, पण शेतकऱ्यांना पाणी नाही! आषाढी वारीसाठी २ टीएमसी पाणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे जिल्ह्यातील पावसामुळे सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी उजनी धरण ५२ टक्क्यांपर्यंत भरले आहे. त्यातील दोन टीएमसी पाणी शासनाच्या परवानगीने आषाढी वारीसाठी भीमा नदीत सोडले जाणार आहे.

दुसरीकडे, जिल्ह्यात पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांनी शेतीसाठीही पाणी सोडण्याची मागणी केली आहे. पण, 'एल निनो'च्या संकटामुळे धरणातून पाणी सोडण्यासाठी शासनाच्या परवानगीची अट घालण्यात आली आहे.

पावसाळा सुरू झाल्याने शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. मात्र, अजूनही अपेक्षित पाऊस नाही. त्यामुळे मोहोळ, पंढरपूर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट, करमाळा, माढा तालुक्यांतील शेतकऱ्यांनी उजनीतून कालव्याद्वारे पाणी सोडण्याची मागणी केली आहे. मात्र, एकाही आमदाराने लाभक्षेत्र विकासच्या अधीक्षक अभियंत्यांना पाण्यासाठी पत्र दिलेले नाही. त्यामुळे



शेतकऱ्यांना उजनीच्या पाण्याची नव्हे, तर पावसाचीच वाट पाहावी लागणार आहे.

**११ वर्षांनंतर पहिल्यांदाच पाण्याची मागणी**

२०१५ मध्ये सोलापूर जिल्ह्यात सरासरीपेक्षा खूपच कमी पाऊस झाला होता. त्यावेळीदेखील शेतकऱ्यांनी ऐन पावसाळ्यात उजनीतून पाणी सोडण्याची मागणी केली होती. त्यानंतर आता २०२६ मध्ये पावसाळा सुरू असताना शेतकऱ्यांची तशीच मागणी आहे. विशेष म्हणजे, गतवर्षी जिल्ह्यात महापूर आला होता. पण, यंदा सरासरी एवढादेखील पाऊस झालेला नाही. पेरण्या खोळंबल्या असून पेरणी केलेल्या क्षेत्रावर दुबार पेरणीचे संकट आहे.

**उजनी धरणातील पाणीसाठा**

एकूण पाणीसाठा : ९१.३५ टीएमसी

उपयुक्त पाणीसाठा : २७.६९ टीएमसी

पाण्याची टक्केवारी : ५१.६० टक्के

# सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी शिवाजी पाटील; व्हाईस चेअरमनपदी गुलाबराव पाटील










**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या सहकार चळवळीतील अग्रगण्य आणि विश्वासार्ह संस्था म्हणून ओळख असलेल्या सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर या संस्थेच्या चेअरमनपदी ज्येष्ठ शिक्षक नेते शिवाजी महादेव पाटील (दक्षिण सोलापूर शाखा) यांची, तर व्हाईस चेअरमनपदी गुलाबराव पाटील (सांगोला शाखा) यांची सर्व संचालकांच्या बहुमताने बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमुळे जिल्ह्यातील शिक्षक वर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

दि. १२ जुलै २०२६ रोजी दुपारी २ वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली. याप्रसंगी जिल्हा उपनिबंधक सहकार कार्यालयाचे अधिकारी आबासाहेब गावडे यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. निवडीनंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित चेअरमन व व्हाईस चेअरमन यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या भावी कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य शिक्षक नेते बाळासाहेब काळे होते. व्यासपीठावर अखिल भारतीय शिक्षक संघाचे राष्ट्रीय सचिव म. ज. मोरे, सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष शिवानंद भरले, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे कोषाध्यक्ष अनिरुद्ध पवार, महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य कार्यकारी अध्यक्ष बब्रुवाहन काशिद, जिल्हाध्यक्ष वीरभद्र यादवाड, रणजीत थिटे, संस्थेचे माजी चेअरमन संभाजीराव फुले, माजी व्हाईस चेअरमन रवींद्र पाटील, रावसाहेब जाधवर, राज्य उपाध्यक्ष सिद्राम कटगेरी, राज्य सदस्य रेवणसिद्ध हत्तुरे, जिल्हा सरचिटणीस रामभाऊ यादव यांच्यासह संचालक विठ्ठलराव काळे, तानाजी गुंड, संजय चेळेकर, रमेश शिंदे, हणमंत सरडे, आबासाहेब जाधवर, रमेश घंटेनवरू, प्रमोद लोंढे, राजेंद्र आवारे, पांडुरंग नाईकनवरे, अशोक पोमाजी, शितल चव्हाण, राणी व्हनमाने, तज्ञ संचालक बाबासाहेब दराडे, तिकटे सर, जिल्हा कार्यकारी सचिव सतीश वाले, काळाप्पा सुतार, दयानंद वठारे, प्रकाश कुंभार, महबूब सवार, बसवराज खिल्लारी, पिरप्पा हडपद तसेच अनेक शिक्षक पदाधिकारी, संचालक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनिर्वाचित चेअरमन शिवाजी महादेव पाटील यांनी आपल्या मनोगतात सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. "संस्थेचा कारभार पूर्णपणे पारदर्शक, प्रामाणिक आणि सभासदकेंद्रित ठेवण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. संस्थेची आर्थिक प्रगती, तंत्रज्ञानाधारित आधुनिक सेवा, सभासदांना जलद व दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे आणि प्रत्येक शिक्षकाच्या हिताचे संरक्षण करणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट राहील," असे त्यांनी स्पष्ट केले.

नवनिर्वाचित व्हाईस चेअरमन गुलाबराव पाटील यांनीही सर्व संचालक व सभासदांचे आभार मानत, "माझ्यावर सोपविलेल्या जबाबदारीचे पूर्ण प्रामाणिकपणे पालन करीन. चेअरमन, संचालक मंडळ आणि सर्व शिक्षक सभासदांच्या सहकार्याने संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी एकदिलाने काम करू. प्रत्येक शिक्षकाच्या अडचणीच्या काळात पतसंस्था आधारवड ठरेल, यासाठी प्रयत्नशील राहू," असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या नेतृत्वाखाली पतसंस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि सभासदाभिमुख बनेल, असा विश्वास व्यक्त केला. शिक्षकांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी पतसंस्थेची भूमिका अधिक प्रभावी होईल आणि सहकार चळवळीला नवे बळ मिळेल, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचा समारोप अभिनंदन, शुभेच्छा आणि संस्थेच्या भावी वाटचालीसाठी सर्वांनी व्यक्त केलेल्या सकारात्मक संकल्पांसह उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

# आषाढी यात्रा 2026 : वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी मंदिर समितीची जय्यत तयारी

## दि. 16 जुलै पासून होणार 24 तास दर्शन व्यवस्था

### भाविकांच्या सेवेसाठी 2 हजार 500 मनुष्यबळ कार्यरत राहणार

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** आषाढी शुध्द एकादशी दि. 25 जुलै रोजी आहे, आषाढी यात्रा कालावधी दि. 15 ते 29 जुलै असा आहे. या कालावधीत सुमारे 18 ते 20 लाख भाविक येण्याची शक्यता असून, यात्रा कालावधीत भाविकांना आवश्यक व मुबलक सोयी-सुविधा मंदिर समितीच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात येतात. मंदिराशी संबंधित सर्व धार्मिक प्रथा, परंपरा, विधी तसेच भाविकांना देण्यात येणाऱ्या विविध सोयी-सुविधांचे नियोजन अंतिम टप्प्यात असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

आषाढी शुध्द एकादशीला पहाटे 2.20 वाजता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा संपन्न होणार आहे. आषाढी यात्रा कालावधीत समितीमार्फत दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून त्यावर ताडपत्री शेड, जादा पत्राशेडची निर्मिती, आपत्कालिन गेट, विश्रांती कक्ष, फॅब्रिकेटेड शौचालये, बसण्याची सुविधा, लाईव्ह दर्शन, कुलर-फॅन, मिनरल



वॉटर आदी सुविधा उपलब्ध राहणार आहेत.

परंपरेप्रमाणे दि. 16 जुलै रोजी श्रींचा पलंग काढून दि. 3 ऑगस्टपर्यंत 24 तास दर्शन व्यवस्था सुरू ठेवण्यात येणार आहे. शासकीय महापूजा, मंदिर समितीमार्फत होणारी श्रींची पाद्यपूजा, नित्यपूजा, श्री संत भानुदास महाराज पुण्यतिथी, विविध संस्थांचे नैवेद्य, संतांच्या भेटी, श्री विठ्ठलाच्या पादुकांची मिरवणूक, महाद्वारकाला, प्रक्षाळपुजा आदी सर्व धार्मिक कार्यक्रमांचे आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.


भाविकांच्या सुविधेसाठी दर्शनरांग व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यात आले असून श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडपातील आठ गाळ्यांपैकी दोन गाळ्यांचा वापर करण्यात येणार आहे. दर्शन मंडप ते कासार घाटपर्यंत स्कायवॉक, स्कायवॉक ते रिध्दि सिध्दी दर्शनमंडपपर्यंत बॅरिकेटींग, ताडपत्री शेड उभारण्यात येत आहे. रिद्धी-सिद्धी दर्शन मंडप परिसरात कायमस्वरूपी दर्शन हॉलचे बांधकाम सुरू असल्यामुळे शेजारील श्री अपशिंगेकर यांची जागा भाडेतत्त्वावर घेऊन तात्पुरते पत्राशेड उभारण्यात येणार आहे. तसेच लक्ष्मण पाटील मंदिर ते गोपाळपूरपर्यंत दर्शनरांगेत तीन ठिकाणी अतिरिक्त पत्राशेड उभारण्यात येणार असून पदस्पर्श दर्शनासाठी श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप ते स्वेरी कॉलेज, गोपाळपूरपर्यंत सुमारे सहा किलोमीटर लांबीची दर्शनरांग राहणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तांत्रिक मान्यता व विद्युत शाखेमार्फत इलेक्ट्रिकल ऑडिट करण्यात येणार असून दर्शनरांगेत आठ ठिकाणी तात्पुरते उड्डाणपूल उभारण्यात येणार आहेत. मुखदर्शनासाठी श्री संत तुकाराम भवन ते छत्रपती संभाजी चौकपर्यंत बॅरिकेटींग व ताडपत्री शेड तसेच छत्रपती संभाजी चौक येथे हलता पूल बसविण्यात येणार आहे.

दर्शनरांगेत शुद्ध पिण्याचे पाणी, चहा, खिचडी वाटप, कुलर, भक्तिगीते, लाईव्ह दर्शन, हिरकणी कक्ष, चार ते पाच विश्रांती कक्ष, ईओसी **(पान 2 वर..)**

# सोलापुरात 13 दुचाकी चोरीची कबुली; 40 चोरींचा मास्टरमाइंड ताब्यात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर गुन्हे शाखेने चार वर्षात सोलापूर, धाराशिव आणि सातारा जिल्ह्यांतून तब्बल 40 दुचाकी चोरी करणाऱ्या अट्टल चोरट्याला अटक केली आहे. अटकेतील आरोपीने गेल्या सहा महिन्यांतच 13 दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव सत्यवान रामहरी भोसले (वय 32, रा.पडसाळी, ता. उत्तर सोलापूर) असे आहे. फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वसंत विहार परिसरातूनएमएच-13 डीके-5511 क्रमांकाची दुचाकी चोरीच्या तपासादरम्यान तो पोलिसांच्या रडारवर आला.

सोलापूर शहरात वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर शहर गुन्हे शाखेने विशेष तपास मोहीम हाती घेतली. सहायक पोलिस निरीक्षक शैलेश खेडकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने विविध घटनांचे तांत्रिक विश्लेषण केले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक संशयित तरुण हेल्मेट हातात घेऊन पायी येत असल्याचे आणि चोरी केल्यानंतर दुचाकीवरून निघून जात असल्याचे स्पष्ट झाले.त्यानुसार पोलिसांनी संशयिताचा शोध सुरू केला. हैदराबाद रोडवरील बाजार समितीजवळ तो चोरीच्या दुचाकीसह असल्याची माहिती मिळताच गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने गेल्या सहा महिन्यांत 13 दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. पुढील तपासात त्याच्याकडून सोलापूर, धाराशिव आणि सातारा जिल्ह्यांतील मिळून 40 दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.पोलिस आरोपीकडून आणखी चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करत असून, चोरीस गेलेल्या दुचाकी जप्त करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## संपादकीय

# कुटुंबांवर वाढला कर्जाचा भार!

भारताची आर्थिक आकडेवारी भक्कम दिसत असली, तरी देशातील कुटुंबांच्या पदरी ही सुबत्ता तितकिशी पडलेली नाही. राष्ट्रीय संपत्ती वाढली, तरी कौटुंबिक उत्पन्नाचा वेग मंदावला आहे. लोकांचे वेतन जागेवरच खिळल्याचे चित्र आहे. हा फरक भरून काढण्यासाठी कुटुंबांनी कर्ज काढण्यास सुरुवात केली आहे. अधिकाधिक लोक दैनंदिन खर्च भागवण्यासाठी क्रेडिट कार्ड, वैयक्तिक कर्जे आणि सुवर्ण कर्जाचा आधार घेत आहेत. हा केवळ महागाईचा परिणाम नसून संपत्तीच्या निर्मिती आणि वाटपातील बिघाडाचे लक्षण आहे. त्याचा फटका देशांतर्गत ग्राहक बाजारपेठेलाही बसत आहे.

कंपन्यांचा नफा वाढला, शेअर बाजार वधारला; मात्र वेतनदरी व्यापक अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलू पाहत आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने वारंवार नमूद केले आहे की, निव्वळ घरगुती बचत ५० वर्षांतील नीचांकी पातळीवर पोहोचली आहे. आर्थिक वर्ष २०२३ मध्ये कुटुंबांची निव्वळ आर्थिक बचत घसरून राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५.२ टक्क्यांवर आली. पूर्वी हे प्रमाण सरासरी ७ ते ८ टक्के असायचे. कुटुंबांवरील कर्जाचा बोजा मात्र दुप्पट झाला. आर्थिक वर्ष २०१४ मध्ये देशाच्या उत्पादनाच्या तुलनेत हे कर्ज ३ टक्के होते, जे २०२३ पर्यंत ५.७ टक्क्यांवर पोहोचले. २०२५ च्या अखेरीस एकूण कौटुंबिक कर्ज राष्ट्रीय उत्पादनाच्या अंदाजे ४१ टक्क्यांच्या पुढे गेले. जगातील सर्वाधिक कर्जबाजारी मध्यमवर्ग भारतात असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

कंपन्यांचा नफा वाढत आहे; पण मजुरी वाढत नाही. संघटित उद्योगांमध्ये कामगारांच्या वेतनाचा वाटा सातत्याने कमी झाला आहे. कामगारांची क्रयशक्ती कमी होत असून, केवळ कंपन्यांच्या नफ्यालाच आधार मिळत आहे. मध्यमवर्गाच्या पगारवाढीचा दर वर्षाला एक टक्क्यांच्या आसपास असताना खर्चात मात्र दरवर्षी ८ ते ९ टक्क्यांनी वाढ होत आहे. पिकांची किमान आधारभूत किंमत उत्पादन खर्चाच्या दीडपट झाल्याचा फायदा जमीनदार शेतकऱ्यांनाच झाला. मजुरीवर जगणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांचे वास्तविक उत्पन्न वर्षाला दीड टक्क्यांपेक्षाही कमी वेगाने वाढले.

### जगण्याचे कर्जीकरण

पूर्वी भारतीय कुटुंबे प्रामुख्याने गृह कर्ज घ्यायची. त्यातून मालमत्ता उभी राहते; पण आता बहुतांश कर्जे तात्पुरती आणि असुरक्षित स्वरूपाची आहेत. ही कर्जे संपत्ती उभी करण्यासाठी नव्हे, तर वर्तमानातील तुटवडा भरून काढण्यासाठी आहेत. मध्यवर्ती बँकेच्या वित्तीय स्थिरता अहवालानुसार, असुरक्षित वैयक्तिक कर्जे आणि ग्राहक पतपुरवठा दरवर्षी २२ ते २५ टक्क्यांनी वाढत आहे. सुवर्ण कर्जांमध्येही मोठी वाढ झाली असून, ते ३.३८ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. म्हणजेच एका वर्षात त्यात १२८.५ टक्क्यांची वाढ झाली आहे.

५० हजार रुपयांपेक्षा कमी असलेल्या लहान कर्जांमध्ये सर्वाधिक वाढ झाली आहे. डिजिटल कर्ज देणारे ॲप्स आणि सूक्ष्म वित्तसंस्था याला खतपाणी घालत आहेत. महिना कसाबसा निभावून नेण्यासाठी कुटुंबे महागडी आणि अल्पमुदतीची कर्जे घेत असून, त्यासाठी उद्याच्या आर्थिक सुरक्षिततेची किंमत मोजत आहेत. खऱ्या उत्पन्नवाढीची किंवा प्रभावी सामाजिक सुरक्षेची जागा ही कर्जे कधीच घेऊ शकत नाहीत. कर्ज सहज उपलब्ध होते, तेव्हा घर, वाहन, प्रवास आणि दैनंदिन खरेदीवर खर्च वाढतो. काही काळासाठी अर्थव्यवस्था मजबूत असल्यासारखी वाटते. व्यापाराला चालना मिळते. बांधकाम क्षेत्र भरभराटते. बँकाही नफ्यात राहतात; परंतु याची किंमत नंतर मोजावी लागते. व्याजाचे हप्ते वाढतात. बचत कमी होते. खर्चाची क्षमता आकुंचन पावते. अनेक देशांतील अनुभव सांगतो की, कौटुंबिक कर्जातील वेगवान वाढीनंतर सहसा आर्थिक विकास मंदावतो, ग्राहक खर्च कमी होतो आणि गुंतवणूक घटते. कर्ज थकण्याचे प्रमाण वाढल्याने बँकांवर ताण येतो. कर्जाच्या जोरावर चालणारी खरेदी मंदावली की, आयातीवरही परिणाम होतो आणि देशाचा व्यापार समतोल बिघडू शकतो.

### जागतिक अनुभव

या चक्रात अडकणारा भारत हा एकमेव देश नाही. अमेरिकेत २०२६ च्या सुरुवातीला कौटुंबिक कर्ज तब्बल १८ हजार ८०० अब्ज डॉलर या विक्रमी पातळीवर पोहोचले. दक्षिण कोरियामध्ये कौटुंबिक कर्ज सुमारे १३५० अब्ज डॉलर झाले. चीनमध्ये कर्जाचा आकार, मंदावलेली उत्पन्नवाढ, भविष्याविषयीचा अविश्वास हे चिंतेचे विषय ठरत आहेत. ऑस्ट्रेलियातील कौटुंबिक कर्ज सुमारे २३५० अब्ज डॉलर इतके असून, ते देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या सुमारे ११४ टक्के आहे. यामुळे गृहनिर्माण बाजार तेजीत राहतो; पण व्याजदर वाढल्यास कुटुंबांच्या हातात इतर खर्चासाठी पैसा उरत नाही. उत्पन्नवाढीपेक्षा कर्जाचा वेग जास्त झाला की, काही काळ अर्थव्यवस्थेला हातभार मिळतो; पण मर्यादेपलीकडचे कर्ज अखेर खरेदीक्षमता संपवते, आर्थिक ताण वाढवते आणि विकासाचा वेग कमी करते.

जगभरातील सरकारे या धोक्याची दखल घेत आहेत. जून २०२६ मध्ये जी-७ देशांच्या नेत्यांनी जागतिक कर्ज समस्येवर अधिक ठोस पावले उचलण्याचे मान्य केले. मोठ्या अर्थव्यवस्था कौटुंबिक आणि सरकारी कर्जाला गंभीर सामूहिक धोका मानत आहेत. संयुक्त राष्ट्राच्या व्यापार आणि विकास परिषदेनेही देशांना विश्वासार्ह वित्तीय योजना आखण्याचे, कर्जाचे व्यवस्थापन काळजीपूर्वक करण्याचे आणि कुटुंबांचे रक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर एकत्र काम करण्याचे आवाहन केले आहे. अनेक देश कर्ज देण्याचे नियम कडक करत आहेत. जोखीम असलेल्या ग्राहक कर्जांवर नियंत्रण आणत आहेत. अनावश्यक खर्चासाठी कर्ज न घेता बचत वाढवण्यास प्रोत्साहन देत आहेत. सरसकट सवलतींऐवजी गरजू कुटुंबांना थेट मदत करत आहेत. व्याजदर धोरण, वित्तीय धोरण आणि औद्योगिक धोरण वेगवेगळे न हाताळता त्यांचा समन्वय साधत आहेत. कर्ज पूर्ण बंद करणे हा यामागचा हेतू नाही. सहज मिळणाऱ्या कर्जाचे रूपांतर कर्ज संकटात होऊ नये, एवढाच यामागचा उद्देश आहे.

भारतासाठी या उपायांमधून घेण्यासारखे अनेक धडे आहेत. या समस्येवर आताच कारवाई करणे गरजेचे आहे. याचे उत्तर उद्योगांना अधिक सवलती देणे हे नाही. कॉर्पोरेट कर कपात आणि उत्पादन प्रोत्साहनांमुळे कारखान्यांची क्षमता वाढली; पण कामगारांचे वेतन वाढले नाही. जीवनावश्यक वस्तू आणि सेवांवरील जीएसटी कमी करावा लागेल. श्रमप्रधान सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना बळ दिल्यास असंघटित क्षेत्रातील कामगारांना औपचारिक रोजगाराच्या चौकटीत आणता येईल. त्यामुळे किमान वेतनाची पातळी उंचावेल. सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षणावर खर्च वाढवावा लागेल. केंद्र सरकारने हा खर्च राज्यांवर न सोडता स्वतः उचलला, तर कुटुंबांकडे इतर गरजांसाठी पैसा उरेल. यामुळे केवळ जगण्यासाठी कर्ज घेण्याची वेळ येणार नाही. निकट भविष्यात भारताचे व्यापक आर्थिक निर्देशांक स्थिर दिसले, तरी ती कदाचित खरी स्थिरता नसेल, ती केवळ कर्जाच्या पायावर उभी असलेली तात्पुरती समृद्धी असेल. कधीतरी हे कर्ज फेडावेच लागेल आणि त्याची किंमत फार मोठी असेल.

# पालखी सोहळा; महाराष्ट्राचे वैभव!

आषाढ महिना सुरू झाला की वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती हाती टाळ मृदंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलचा गजर करीत, ज्ञानोबा – तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धमार्ची भगवी पताका फडकवीत विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते.

आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव!

पालखी सोहळा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. १३ व्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करुन घेतले. हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज तुकाराम महाराज यासारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली.

गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. आतातर परदेशातूनही लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. १९६५ च्या सुमारास आळंदीच्या पालखीमध्ये पाच हजार वारकरी सहभागी झाल्याचा उल्लेख दि ब मोकाशी यांच्या पुस्तकात आढळतो. आज ती संख्या लाखोंच्या घरात पोहचली आहे. वृद्धांप्रामाणे तरुणही आता वारीत सहभागी होत आहेत. सहकुटूंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता लाखो भाविक वारीत सहभागी होतात.

वारी म्हणजे नियोजनाचे सर्वोत्तम उदाहरण!

मार्च महिन्यातच दिंडीचे नियोजन होते. दिंडीतील सहभागी वारकरी, आचारी, शिधा, मुक्कामाची सोय याचे सर्व नियोजन मार्च महिन्यातच होते. मार्च महिन्यात सुरू झालेले हे दिंडीचे नियोजन दिंडी पुन्हा गावी परत येण्यापर्यंतचे असते. वारीतील शिस्त तर काय वर्णवावी! कोठेही गडबड गोंधळ नसतो. स्वयंशिस्तीने चालणाऱ्या वारकऱ्यांना आस असते ती केवळ विठुरायाच्या भेटीची ! लाखो वारकरी एकत्रित असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. पालखी मार्गावर पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक उभे असतात. साधू संत येती घरा.... तोचि दिवाळी दसरा..... ! ही भावना त्यामागे असते.

अनेक सेवाभावी संस्था दिंडीतील वारकऱ्यांसाठी फराळ व आहाराचे वाटप करतात. शासन स्तरावरुन देखील पालख्यांचे योग्य नियोजन केले जाते. पिण्याच्या पाण्याची व मुक्कामाची योग्य सोय केली जाते. वारी दरम्यान गृह विभागाकडून चोख सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते. आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तत्पर असते. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक कायम वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध असते. आतातर नेटकरी नेटवरही वारीचे अपडेट देत असतात. फेसबुक, ट्विटर सारख्या सोशल मीडियावर देखील आता वारीचा अमूभव घेता येतो. त्यामुळे वारीदेखील आता ग्लोबल झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती साठी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मार्फत सन 2025-26 या शैक्षणिक वर्षात इयत्ता 10 वी, 12 वी, पदवी,पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये विशेष प्राविण्याने 60% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या मांग, मातंग, मिनी-मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी,मदारी,राधेमांग,मांग गारुडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा या जातीतील विदयार्थी/ विदयाथीर्नी महामंडळाकडून जेष्ठता व गुण क्रमांकानुसार जिल्हयातील प्रथम 03 ते 05 विदयार्थ्यांना निधीच्या उपलब्धतेनुसार प्रोत्साहनपर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

तरी इच्छुक मांग, मातंग, मिनी-मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा या जातीतील विदयार्थ्यांनी/विदयार्थीनी दि.28 जुलै 2026 पर्यंत महामंडळाचे जिल्हा कार्यालय,डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,सात रस्ता, शासकीय विश्रामगृहाच्या पाठीमागे,बीग बजार समोर, सोलापूर येथे प्रत्यक्ष अथवा पोष्टाव्दारे अर्ज सादर करावे. (सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.) दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.अशी माहिती जिल्हा व्यवस्थापक लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ सोलापूर यांनी दिली आहे.

सोबत :-

1. अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती मिळण्यासाठी हस्तलिखित अर्ज.
2. सन 2025-26 या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झाल्याची मार्कलिस्ट
3. शाळा सोडल्याचा दाखला,
4. जातीचा दाखला
5. पुढील वर्षात प्रवेश घेतल्याची पावती.
6. रेशनकार्ड
7. आधारकार्ड इ.

# शहरात मांस, मटण विक्रीस मनाई

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी शुध्द एकादशी सोहळा 25 जुलै 2026 रोजी असून , यात्रा कालावधी दि.15 जुलै ते 29 जुलै 2026 असा आहे. या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या कालावधीत पंढरपूर शहरात कायदा व सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी दि.15 जुलै ते 29 जुलै 2026 या कालावधीमध्ये मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्रीवर उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी बंदी आदेश जारी केले आहेत.

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (2) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून उपविभागीय दंडाधिकारी श्री इथापे यांनी सदर आदेश जारी केले आहेत.

## करकंब व परिसरात मांस, मटण विक्रीस मनाई

आषाढी यात्रेसाठी राज्यातील विविध ठिकाणाहून मानाच्या व महत्त्वाच्या पालख्या करकंब (ता.पंढरपूर) येथे मुक्काम करीत असतात. या ठिकाणी लाखो भाविक करकंबसह आसपासच्या गावात मुक्कामास असतात. विविध सामाजिक व राजकीय संघटनाकडून तसेच भाविकांकडून मांस, मटण विक्रीस बंदी घालावी अशी मागणी होती.त्या अनुषंगाने करकंब व पांढरेवाडी, व्होळे, देवडे, खेडभोसे येथे दिनांक 20 जुलै ते 25 जुलै 2026 या कालावधीत मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (2) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून उपविभागीय दंडाधिकारी इथापे यांनी सदर आदेश जारी केले आहेत.

पान १ वरून

# आषाढी यात्रा 2026 ...

केंद्र, हरवले-सापडले विभाग, अन्नछत्र, सार्वजनिक सूचना प्रणाली, स्वच्छतागृहे, प्राथमिक आरोग्य केंद्र, अतिदक्षता विभाग, चौकशी कक्ष, सीसीटीव्ही यंत्रणा, अग्निशमन वाहने, रुग्णवाहिका व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध राहणार आहेत.

देणगी व्यवस्थेसाठी अतिरिक्त स्टॉल, सोने-चांदी भेटवस्तूंसाठी स्वतंत्र कक्ष, वेदांत, व्हिडिओकॉन व श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवास येथे निवास व्यवस्था, भाविकांसाठी अपघात विमा योजना, स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने स्वच्छता मोहीम, बहुभाषिक चौकशी कक्ष, दोन अद्ययावत रुग्णवाहिका, उपजिल्हा रुग्णालयामार्फत अतिदक्षता विभाग व प्रथमोपचार केंद्र, भारत सेवाश्रम संघ, कलकत्ता व वैष्णवी चॅरिटेबल अँड मेडिकल ट्रस्ट, मुंबई यांच्यामार्फत वैद्यकीय सुविधा तसेच बाजीराव पडसाळी येथे तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालयामार्फत वैद्यकीय कक्ष उपलब्ध राहणार आहे.

मंदिरात मोबाईल व कॅमेरा नेण्यास बंदी असल्यामुळे पाच ते सहा ठिकाणी मोबाईल लॉकर सुविधा उपलब्ध राहील. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, श्री संत तुकाराम भवन व श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवास येथे आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार असून, भाविकांसाठी बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद अल्प दरात उपलब्ध राहील. चंद्रभागा नदीपात्रात चेंजिंग रूम, दर्शनरांगेत हिरकणी कक्ष तसेच आषाढी एकादशी निमित्त मंदिरात विशेष फुलांची सजावट करण्यात येणार आहे.

यात्रेदरम्यान मंदिर समितीचे कायम कर्मचारी, हंगामी कर्मचारी स्वयंसेवी संस्थांचे सुमारे स्वयंसेवक असे एकूण सुमारे 2 हजार 500 मनुष्यबळ भाविकांच्या सेवेसाठी कार्यरत राहणार आहे. यात्रेदरम्यान पदस्पर्श दर्शन 22 तास 15 मिनिटे तर मुखदर्शन 24 तास उपलब्ध राहणार आहे. सुरक्षेसाठी स्ट्रक्चरल ऑडिट, इलेक्ट्रिकल ऑडिट, बॅग स्कॅनर मशिन, मॅन काउंटिंग मशीन, 150 सीसीटीव्ही कॅमेरे, मेटल डिटेक्टर, जनरेटर, 40 वॉकी-टॉकी संच, सार्वजनिक सूचना प्रणाली, चौकशी कक्ष आदी सुविधा उपलब्ध राहतील.

श्री संत तुकाराम भवन येथे ईओसी केंद्र उभारण्यात येणार असून तहसीलदार दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल. येथे सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष, लाईव्ह दर्शन, सार्वजनिक सूचना प्रणाली, अग्निशमन वाहन व वॉकी-टॉकी व्यवस्था राहील. चंद्रभागा नदीपात्रात एसडीआरएफ, मुळशी आपत्ती व्यवस्थापन पथक, स्थानिक पोहणारे, मंदिर कर्मचारी आदी मिळून सुमारे 250 कर्मचारी कार्यरत राहतील. महिला भाविकांसाठी 25 चेंजिंग रूम व 6 हिरकणी कक्ष महिला सुरक्षा कर्मचाऱ्यांसह उपलब्ध राहणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

सदरची यात्रा निर्विघ्न, सुरक्षित व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य आमदार रामचंद्र कदम, शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ॲड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, प्रणिता भालके, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा तसेच मंदिर समितीचे सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी, स्वयंसेवक आणि सर्व संबंधित यंत्रणा समन्वयाने परिश्रम घेत आहेत.

# आषाढी वारी 2026 - जड वाहतुक नियमन जाहीरनामा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री क्षेत्र पंढरपूर येथे दि. 15 जुलै 2026 ते 29 जुलै 2026 या कालावधीत आषाढीवारी भरणार असुन सदर यात्रा कालावधीत पंढरपूर शहरातून जाणा-या जड वाहतुकीमुळे पंढरपूर शहरात दाखल होणाऱ्या भाविकांच्या जिवितेला धोका व वाहतुक नियमनास अडथळा होवू नये याकरीता उपविभागीय पोलीस अधिकारी, पंढरपूर उपविभाग पंढरपूर यांनी त्यांचेकडील पत्र जावक क्रं 4851964/2026 दि. 08 जुलै 2026 अन्वये व पंढरपूर शहराकडे येणारी जड- अवजड वाहतुक संबंधीत पोलीस ठाणे हददीतील योग्य त्या पॉईटवरून बंद करून ती अन्य पयार्यी मार्गाने वळविणेबाबत निदर्शनास आणून दिले आहे. तसेच

महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 33 (1) (ब) अन्वये अधिकारान्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी एस. कार्तिकेयन व पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण अतुल वि. कुलकर्णी यांच्या आदेशान्वये भाविकांचे सुरक्षिततेच्या कारणावरून दिनांक 17 जुलै 2026 रोजी 23.00 वा. ते दिनांक 29 जुलै 2026 रोजी 24.00 वा. पर्यंत पंढरपूर शहर बाहय मार्गावरून जाणारी जड वाहतूक अन्य पयार्यी मार्गाने वळविणे आवश्यक असल्याने खालील नमूद ठिकाणावरून जड-अवजड वाहतूक (शासकीय अन्नधान्य, डिझेल, पेट्रोल, गैस सिलेंडर, उस वाहतुक करणारी वाहने वगळुन) बंद करणेबाबत निर्देशित करीत आहोत.

**पर्यायी मार्ग -**

पोलीस ठाणे- मोहोळ- जड वाहतुक प्रवेश बंद ठिकाणे- शिवाजी चौक - पर्यायी मार्ग -मोहोळ -कामती-मंगळवेढा-सांगोला किंवा मोहोळ-शेटफळ-टेंभुर्णी- वेळापुर -सांगोला.

पोलीस ठाणे-मोहोळ- जड वाहतुक प्रवेश बंद ठिकाणे- शेटफळ चौक- पयार्यी मार्ग- शेटफळ -टेंभुर्णी अकलूज -वेळापुर- महुद- सांगोला किंवा शेटफळ-मोहोळ- कामती-मंगळवेढा-सांगोला.

पोलीस ठाणे-मोहोळ- जड वाहतुक प्रवेश बंद ठिकाणे - टाकळी सिकंदर - पर्यायी मार्ग- टाकळी सिंकदर-कुरूल-मोहोळ-शेटफळ- टेंभुर्णी किंवा टाकळी सिंकदर- कुरूल-कामती-मंगळवेढा- सांगोला-महुद- वेळापुर.

पोलीस ठाणे - मोहोळ -जड वाहतुक प्रवेश बंद ठिकाणे-पेनुर - पर्यायी मार्ग- पेनुर-मोहोळ-कामती- मंगळवेढा-सांगोला किंवा पेनुर- मोहोळ-शेटफळ-टेभुर्णी-वेळापुर.

पोलीस ठाणे -कामती -जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण -कुरूल चौक- कुरूल-कामती- मंगळवेढा-सांगोला-महुद-वेळापुर अकलूज किंवा कुरूल-मोहोळ- शेटफळ-टेंभुर्णी-अकलूज-वेळापूर.

पोलीस ठाणे- टेंभूर्णी - जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण -वेणेगाव फाटा- वेणेगाव- टेभुर्णी- अकलूज -वेळापूर- महूद -सांगोला-इंदापूर किंवा वेणेगाव-शेटफळ-मोहोळ-कामती- मंगळवेढा- सांगोला.

पोलीस ठाणे- टेंभूर्णी- जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण- अकलुज चौक-पयार्यी मार्ग- टेभुर्णी-शेटफळ-मोहोळ- कामती-मंगळवेढा-सांगोला किंवा टेभुर्णी-इंदापूर मार्गे इच्छित स्थळी. ( दि.23 जुलै 2026 रोजी 20.00 पासुन अकलूज चौकातून सर्वा प्रकारची वाहतुक चालू राहील.)

पोलीस ठाणे -वेळापूर -जड वाहतूक प्रवेश बंद ठिकाण -श्री ज्ञानेश्वर चौक- पर्यायी मार्ग - वेळापूर ते साळमुख ते महुद- सांगोला-मंगळवेढा-कामती. किंवा वेळापुर -टेंभूर्णी-शेटफळ -मोहोळ -कामती.

पोलीस ठाणे -वेळापूर -जड वाहतूक प्रवेश बंद ठिकाण -साळमुख चौक-पर्यायी मार्ग-साळमुख ते महुद-सांगोला -मंगळवेढा-कामती. किंवा साळमुख- वेळापूर-टेंभूर्णी- शेटफळ-मोहोळ-कामती.

पोलीस ठाणे-सांगोला -जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण- महुद चौक- पयार्यी मार्ग-महुद- सांगोला-मंगळवेढा-कामती-मोहोळ किंवा महुद- वेळापूर -टेंभूर्णी -शेटफळ- मोहोळ.

पोलीस ठाणे-सांगोला -जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण- मंगळवेढा-कोल्हापूर बायपास पुलाखाली- पयार्यी मार्ग- सांगोला-मंगळवेढा-कामती- मोहोळ-शेटफळ-टेभुर्णी. किंवा सांगोला- महुद-वेळापूर- टेंभूर्णी -शेटफळ- मोहोळ.

पोलीस ठाणे-मंगळवेढा -जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण- मंगळवेढा नाका बायपास-पर्यायी मार्ग- मंगळवेढा-कामती-मोहोळ -शेटफळ -टेंभुर्णी किंवा मंगळवेढा- सांगोला-महुद-वेळापूर-टेंभूर्णी.

पोलीस ठाणे-करकंब -जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण- भोसे पाटी-पयार्यी मार्ग- करकंब- वेणेगाव-टेंभुर्णी- अकलुज वेळापूर- महूद -सांगोला. किंवा करकंब-वेणेगाव- शेटफळ- मोहोळ- कामती- मंगळवेढा- सांगोला.

तरी सदरचा आदेश हा दि. 17 जुलै 2026 रोजी 23.00 वा.पासुन ते दि.29 जुलै 2026 रोजी 24.00 वाजे पर्यंत अंमलात राहील आषाढीवारी कालावधी संपताच जा.क्रं/जिवाशा/पंढरपूर जड वाहतुक नियमन /2019/19 दिनांक 07/04/2019 अन्वये आदेश पुर्ववत अंमलात राहील.

असा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी एस कार्तिकेयन (भा.प्र.से.) व पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण अतुल वि. कुलकणी (भा.पो.से.) यांनी दिला आहे.

# सर्व शासकीय यंत्रणांनी जिल्हा वार्षिक योजना सन 2026-27 साठीचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत -पालकमंत्री गोरे

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- जिल्हा नियोजन समितीने जिल्हा वार्षिक योजना सन 2026-27 सर्वसाधारण अंतर्गत चा 842 कोटीचा प्रारूप आराखडा मंजूर केलेला आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी मंजूर केलेला निधी अंतर्गतची कामांचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत. विभाग प्रमुखांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मंजूर करण्यात आलेला निधी ज्या कामासाठी मंजूर केला आहे त्याच कामावर शंभर टक्के खर्च करावा, असे आवाहन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.



नियोजन भवन येथील समिती सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, महापौर विनायक कोंड्याल, खासदार प्रा. ज्योती वाघमारे, खासदार ओमराजे निंबाळकर, खासदार प्रणिती शिंदे, जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन, महापालिका डॉ. सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला, प्रीतम कुंटला यांच्या सह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 अंतर्गत जिल्हाधिकारी यांच्यासह नियोजन समितीचे सर्व अधिकारी यांनी समितीकडून 100% मान्यता दिलेला निधी खर्चही 100% केलेला आहे. जिल्हा नियोजन समितीचे हे सर्वोत्तम काम असून हे काम केल्याबद्दल जिल्हाधिकारी यांच्यासह सर्व विभाग प्रमुखांचे कौतुक आहे. तसेच पालकमंत्री कार्यालयाकडून कामे पूर्ण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे विशेष कार्य अधिकारी श्री. महादेव घुले यांच्या ही कामाची त्यांनी प्रशंसा केली. असेच काम जिल्हा वार्षिक योजना सन 2026-27 मध्ये झाले पाहिजे, यासाठी सर्व यंत्रणा प्रमुखांनी त्यांच्या विभागांना मंजूर केलेला निधी अंतर्गतच्या कामाचे प्रस्ताव तात्काळ समितीला सादर करून त्याच्या मान्यता घ्याव्यात व तो निधी विहित काल मयार्दापूर्वी मंजूर कामावर 100% खर्च करण्याचे काटेकोरपणे नियोजन करावे ,असे त्यांनी निर्देशित केले.

आपल्या सोलापूर जिल्ह्यात पाऊस अत्यंत कमी झालेला आहे त्यामुळे शेतकरी व नागरिकांनी पाणी अत्यंत जपून वापरले पाहिजे. सद्यस्थितीत पिण्याच्या पाण्याला अधिक महत्त्व दिले आहे. शेतकऱ्यांच्या शेती पंपाला वीज पुरवठा दोन तासात केला जात होता, परंतु शेतकरी बांधवांची मागणी लक्षात घेऊन आता दररोज पाच तास शेती पंपाला वीज पुरवठा देण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. जिल्ह्यात पावसाचे प्रमाण वाढल्यानंतर वीजपुरवठा आणखी सुरळीत करण्यात येईल, असेही पालकमंत्री श्री. गोरे यांनी यावेळी सांगितले.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दि. ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा नियोजन समिती बैठकीतील इतिवृत्तास अनुसरून केलेल्या कार्यवाहीच्या अनुपालन अहवालास मान्यता दिली. त्यानुसार जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ (सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना) दि. ३१ मार्च, २०२६ अखेरच्या खर्चास मान्यता देण्यात आली. सन २०२६-२७ साठी ८४२ कोटी रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी देण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी पालकमंत्री महोदय व लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणे सर्व संबंधित विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 सर्वसाधारण योजनेसाठी दि. ३१ मार्च २०२६ अखेर ७८३ कोटी रुपयांची तरतूद होती. या तरतुदीइतकाच म्हणजे ७८३ कोटी रुपये खर्च झाल्यामुळे खचार्ची टक्केवारी १००% नोंदवण्यात आली. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १५१ कोटी तरतूद होती, या उपयोजनेसाठी १५१ कोटी रुपये खर्च झाले असून खर्च १००% झाले. आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेसाठी ४ कोटी ६४ लाख ५१ हजार तरतूद होती व ४ कोटी ५३ लाख ६५ जात रुपये खर्च झाला. त्यामुळे खचार्ची टक्केवारी ९९.८३% इतकी नोंदवण्यात आली. एकूण तरतूद ९३५ कोटी ४४ लाख ५१ हजार रुपये इतकी असून एकूण खर्च १००% झालेला आहे, अशी माहिती जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी बैठकीत दिली.

त्याचप्रमाणे जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ च्या कामांच्या प्रारूप आराखड्यास मान्यता देण्यात आली. या आराखड्यासाठी शासनाकडून एकूण ६९३.९० कोटींची मर्यादा कळविण्यात आली होती. राज्यस्तरीय बैठकीत नागरी भागासाठी विशेष अतिरिक्त नियतव्यय ८०.२६ कोटी रुपये कळविण्यात आले. तसेच जिल्ह्यातील अक्कलकोट व सांगोला या दोन आकांक्षित तालुक्यांसाठी १०.०० कोटी रुपये समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे एकूण अंतिम नियतव्यय ८४२ कोटी रुपये इतका हसून या समितीने मान्यता देण्यात यावी असे त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तम जानकर, आमदार राजेंद्र राऊत,आमदार समाधान आवताडे, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार नारायण पाटील, आमदार राजू खरे यांनी बैठकीमध्ये विविध सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न मांडून ते सोडवण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी तातडीने काम करण्याची मागणी केली.

## वात्रटिका

### ढिगाऱ्यातील आक्रोश

वाचवा म्हणून आक्रोश करी
ढिगांयाखाली दबलेली मोशी...
कचऱ्याची जिंदगी कर्चयात
अडकली याला कोण दोषी...
तुमच्या आमच्या जगण्याला
कचऱ्याचीच किंमत आहे...
खरे असूनही हे बोलण्याची
कोणात हिंमत आहे... ?

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादक: श्री पांडुरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटिंग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालय: एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादक: पांडुरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादक: सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागार: ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# राजेंद्र गुंड यांना जिल्हास्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान



**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील विठ्ठलवाडीचे आदर्श शिक्षक तथा दैनिक पुण्यनगरीचे मानेगाव प्रतिनिधी राजेंद्रकुमार बाळू गुंड यांना पत्रकारितेच्या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल दैनिक पुण्यनगरी समूहाच्या वतीने दिला जाणारा सन-2026 चा जिल्हास्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते व उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत स्मृतिचिन्ह,शाल व पुष्पगुच्छ देऊन सोलापूर येथे प्रदान करण्यात आला.

आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबरोबरच फावल्या वेळेत मागील 10 वर्षापासून पत्रकारितेचा छंद व आवड जोपासली आहे.त्यांनी परखड व निर्भिड लेखणीच्या माध्यमातून शेतकरी,गोरगरीब व सर्वसामान्य जनता तसेच शिक्षण,कृषी,सहकार,आरोग्य, बांधकाम क्षेत्राशी निगडित विविध सामाजिक प्रश्न व समस्या मांडण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे.त्यांच्या लेखणीची दखल घेऊन अनेक प्रश्न व समस्या मार्गी लागल्या आहेत.त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून दाखवलेले सातत्य, वस्तुनिष्ठता,सामाजिक बांधिलकी व अन्यायाविरुद्ध उठवलेला आवाज,गुणवंतांचा गौरव या गोष्टी खरोखरच वाखाणण्याजोग्या आहेत. याची दखल घेऊन त्यांना या मानाच्या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

यावेळी खासदार ज्योती वाघमारे,दैनिक पुण्यनगरीचे संचालक प्रतीक शिंगोटे, सरव्यवस्थापक मंगेश कांचन, आवृत्तीप्रमुख व्यंकटेश पटवारी,वृत्तसंपादक रघुवीर शिराळकर,जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, संस्थापक जनमेजयराजे राजे भोसले,जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन,कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर,मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन,महापौर विनायक कोड्याल,उद्योगरत्न प्रणिता शिंदे,सरपंच संदीप पाटील, भाऊसाहेब पाटील,आर्या शिंदे,युवानेते कृष्णा शिंदे, विठ्ठलराव शिंदे प्राथमिक पतसंस्थेचे संचालक सुधीर गुंड,मेघना गुंड,डॉ.राजवर्धन गुंड,मेघश्री गुंड यांच्यासह अनेक मान्यवर व शिक्षक उपस्थित होते.

# सीना-माढा व खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजनांबाबत बैठक

## आ. अभिजीत पाटील यांच्या पुढाकारातून यशस्वी बैठक संपन्न



**माढा (कटूसत्य वृत्त):-** जलसंधारण व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे सीना-माढा उपसा सिंचन योजना तसेच खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजना संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत माढा तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या सिंचनाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी सीना-माढा उपसा सिंचन योजनेत तुळशी, बावी, परितेवाडी, अंजनगाव (खे.), कुर्डू, अंबाड व पिंपळखुटे या सात गावांचा समावेश करणे, सुमारे २० वर्षे जुन्या झालेल्या मोटारींच्या जागी नवीन मोटारी बसविणे, सीना नदीच्या बोगद्यात नियोजनबद्ध पद्धतीने पाणी सोडणे, खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजना तातडीने सुरू करणे, प्रकल्पासाठी संपादित झालेल्या जमिनीवरील फळझाडांच्या प्रलंबित नुकसानभरपाईचे तातडीने वाटप करणे तसेच नदीकाठावरील विस्कळीत विद्युत व्यवस्था सुरळीत करण्याच्या मागण्या करण्यात आल्या.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सर्व मागण्या गांभीर्याने ऐकून घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सीना-माढा उपसा सिंचन प्रकल्प व खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजनेची कामे गतीने पूर्ण करण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश दिले.

माढा तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या सिंचनासंदर्भातील प्रलंबित प्रश्न सोडवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी आमदार नारायण पाटील, भारत शिंदे, अमोल गायकवाड, विजय भगत, शरद मोरे, प्रकाश चोपडे, राजाभाऊ भांगिरे, संजय भोंगे, राजु भानवासे, गणेश गुंडगिरे, बंडु घाडगे, अजिंक्य काटकर, बालाजी टोणपे, रामकृष्ण चोपडे, बाळासाहेब चोपडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# करमाळा आगारात नवीन एसटी बसचे आगमन

## आ. नारायण आबा पाटील यांच्या हस्ते स्वागत



**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** करमाळा व कुडुर्वाडी आगारांच्या प्रवाशांसाठी दिलासादायक ठरणाऱ्या नव्या एसटी बस आज करमाळा आगारात दाखल झाल्या. आमदार नारायण आबा पाटील यांच्या पाठपुराव्यातून करमाळा व कुडुर्वाडी आगारांसाठी प्रत्येकी पाच अशा एकूण दहा नवीन बस मंजूर झाल्या असून, त्यापैकी करमाळा आगारासाठीच्या बसांचे स्वागत आज आमदार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात नगरसेवक संजय सावंत, श्री आदिनाथ साखर कारखान्याचे संचालक देवानंद बागल, संचालक आबासाहेब अंबारे, पंचायत समिती सदस्य स्वप्नील काळे, बाजार समिती सदस्य बाळासाहेब पवार, आदिनाथ युवा संचालक रविकिरण फुके, माजी संचालक विठ्ठलभाऊ शिंदे, पंचायत समितीचे माजी सभापती गहिनीनाथ ननवरे, माजी सदस्य जयराम सोरटे, तात्या काळे, ॲड. लुनावत, ॲड. घोलप, भीमराव गाडगे, उमेश सरडे, शेतकरी नेते अण्णा सुपणावर, विनोद शिंदे, गौतम वारे, बाळासाहेब अडसूळ, रामलिंग देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

करमाळा आगाराच्या वतीने आगार व्यवस्थापक प्रमोद शिंदे, स्थानक प्रमुख शिवाजी कानाडे व वाहतूक निरीक्षक पंकज जाधव यांनी आमदार नारायण आबा पाटील यांचा सत्कार करून नवीन बसांच्या आगमनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी बोलताना आमदार नारायण आबा पाटील म्हणाले की, करमाळा व कुडुर्वाडी आगारांसाठी पहिल्या टप्प्यात एकूण दहा नवीन बस मंजूर झाल्या आहेत. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात आणखी दहा नवीन बस पुढील महिनाभरात उपलब्ध होणार असल्याने दोन्ही आगारांच्या बससेवेला अधिक बळ मिळणार आहे. वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करून ग्रामीण भागातील बसफेऱ्यांमध्येही सुधारणा करण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले.

करमाळा आगारातील रिक्त कर्मचारी पदांचा प्रश्नही लवकर मार्गी लावण्यासाठी आपण परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी चर्चा केली असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा व कुडुर्वाडी आगारातील विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्यास गती मिळेल, असा विश्वासही आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

याशिवाय करमाळा बसस्थानकाच्या नूतनीकरणासाठी यापूर्वी भरीव निधी मंजूर करून हे काम पूर्णत्वास नेल्याची आठवण करून देत, जेऊर येथील नवीन बसस्थानकाचे बांधकामही अंतिम टप्प्यात असून ते लवकरच प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील नागरिकांना सुरक्षित, वेळेवर आणि दर्जेदार सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देणे ही आपली प्राथमिकता असून, करमाळा तालुक्यातील दळणवळणाच्या सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील, अशी ग्वाहीही आमदार नारायण आबा पाटील यांनी यावेळी दिली.

नवीन बस आगारात दाखल झाल्याने चालक, वाहक, कर्मचारी तसेच प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण असून, या बसांमुळे करमाळा व परिसरातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी व विश्वासार्ह प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

# मतदार यादी पुनर्निर्माण अभियानात कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा- पृथ्वीराज पाटील



**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडून सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR) अभियानात आमदार नारायण पाटील गटातील सर्व कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून गावागावातील पात्र नागरिकांची मतदार म्हणून नोंदणी करून घ्यावी, तसेच मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी सतर्क राहावे, असे आवाहन पाटील गटाचे युवा नेते पृथ्वीराज पाटील यांनी केले आहे.

याबाबत माहिती देताना पृथ्वीराज पाटील म्हणाले की, एसआयआर प्रक्रिया ही आगामी ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विधानसभा आणि इतर निवडणुकांसाठी अत्यंत महत्त्वाची असून, अचूक व पारदर्शक मतदार यादी तयार करण्याचा हा महत्त्वाचा टप्पा आहे. त्यामुळे प्रत्येक गावातील व वाडी-वस्तीवरील १८ वर्षे पूर्ण केलेल्या नवमतदारांनी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट झाले आहे का, याची खात्री करून घ्यावी.

तसेच मतदार यादीत दुबार किंवा बोगस नावे आढळल्यास, तसेच मृत व्यक्ती किंवा कायमस्वरूपी स्थलांतरित झालेल्या नागरिकांची नावे अद्याप यादीत असल्यास, संबंधित बीएलओ यांच्याकडे तातडीने हरकत नोंदवावी, असेही त्यांनी सांगितले.

विधानसभा निवडणुकीपूर्वी पाटील गटातील अनेक कार्यकर्त्यांनी बीएलए (Booth Level Agent) म्हणून जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली होती. त्यामुळे मतदार यादी अधिक अचूक आणि पारदर्शक बनण्यास मदत झाली. आता आगामी ग्रामपंचायत निवडणुका आणि भविष्यातील सर्व निवडणुका लक्षात घेऊन कार्यकर्त्यांनी पुन्हा एकदा जबाबदारीने या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

एसआयआर मोहिमेची प्रमुख उद्दिष्टे म्हणजे मतदार यादीतील बोगस व दुबार नावे वगळणे, मृत व स्थलांतरित नागरिकांची नावे कमी करणे, नवमतदारांची नोंदणी करणे आणि मतदान प्रक्रियेत पारदर्शकता वाढविणे ही आहेत.

पाटील गटातील सर्व आजी-माजी पदाधिकारी, आमदार नारायण आबा पाटील मित्रमंडळाचे पदाधिकारी तसेच बीएलए म्हणून जबाबदारी सोपविण्यात आलेल्या कार्यकर्त्यांनी या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा. मतदार यादी, बीएलओ किंवा एसआयआर प्रक्रियेबाबत अधिक माहिती अथवा तक्रारी असल्यास आमदार कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही युवा नेते पृथ्वीराज पाटील यांनी केले.


**विश्वशक्ती सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ सोलापूर**
**वेणुगोपाल नगर, कुमठा नाका, सोलापूर**
नोंदणी क्रमांक एफ-१७६८९/सोलापूर.
**हरवले आहे**
तमाम लोकांना कळविण्यात येते श्री विश्वशक्ती सांकृतिक कला व किडा मंडल सोलापूर या संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्रे अनुक्रमे महा/८२८/२००६ व एफः-१७६८९/सोलापूर हे दोन्ही प्रमाणपत्र हरविलेले आहे. तरी कोणास सापडल्यास अथवा आढळून आल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा हि विनंती.
सचिव
श्री. नरसप्पा आदप्पा सरला
१७३/१७४, वेणुगोपाल नगर कुमठा नाका सोलापूर
मो.नं. ९८९०९४२६७४
सही/-
श्री. नरसप्पा आदप्पा सरला



**श्री वेणुगोपाल चॅरिटेबल ट्रस्ट सोलापूर**
**वेणुगोपाल नगर, कुमठा नाका, सोलापूर**
नोंदणी क्रमांक महा/५५९/सोलापूर.
**हरवले आहे**
तमाम लोकांना कळविण्यात येते श्री वेणुगोपाल चॅरिटेबल ट्रस्ट सोलापूर या संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्रे अनुक्रमे महा/५५९/२००६ हे प्रमाणपत्र हरविलेले आहे. तरी कोणास सापडल्यास अथवा आढळून आल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा हि विनंती.
सचिव
श्री. नरसप्पा आदप्पा सरला
१७३/१७४, वेणुगोपाल नगर कुमठा नाका सोलापूर
मो.नं. ९८९०९४२६७४
सही/-
श्री. नरसप्पा आदप्पा सरला



**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, सांगली**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सोलापूर**
**निविदा नोटीस क्रं. १ सन २०२६-२०२७ (२री मागणी)**
**शुद्धिपत्रक**

कार्यकारी अभियंता, मजीप्रा विभाग, सोलापूर कार्यालयाची निविदा नोटीस क्रं. १ सन २०२६-२०२७ (२री मागणी) दैनिक कटूसत्य या वर्तमान पत्रात दि.१४/०७/२०२६ रोजी प्रसिध्द झालेली आहे.

सदर प्रसिद्धिपत्रकातील कॉलम क्र. ९ मध्ये सिलबंद निविदा स्विकारण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ खालीलप्रमाणे तपशील प्रसिद्ध झाला होता.

कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग सोलापूर दिनांक २४/०७/२०२६ रोजी ठीक दु. १३.०० वाजता. (शक्य असेल तर)

वरील तपशीलाऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे

अधीक्षक अभियंता म.जी.प्रा. मंडळ सांगली/कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.विभाग सोलापूर दि. १४/०७/२०२६ दि. २३/०७/२०२६ कार्यालयीन वेळेत

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,**
**सोलापूर**


# एमआयडीसीतील निष्क्रिय भूखंड काढून घेणार - उद्योगमंत्री उदय सामंत



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील उद्योगाला चालना मिळावी यासाठी उद्योग विभागाच्या वतीने उद्योग स्नेही धोरण राबवण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व एमआयडीसीमध्ये उद्योजकांनी चांगले उद्योग उभा करून स्थानिकांना रोजगार उपलब्ध करावा यासाठी उद्योग विभागाच्या वतीने एमआयडीसीमध्ये दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी केले.

शासकीय विश्रामगृह येथील सभागृहात सोलापूर जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटना समवेत आयोजित आढावा बैठकीत उद्योग मंत्री डॉ. सामंत मार्गदर्शन करत होते. यावेळी खासदार प्रा. ज्योतीताई वाघमारे, आमदार राजू खरे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र उमेशचंद्र दंडगव्हाळ, प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी शिवाजी राठोड, यंत्रमाग संघ डायरेक्टर नारायण आडकी, उपाध्यक्ष टेक्सटाईल फाउंडेशन जयंत श्रीअकेन, व्यवस्थापक सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन एस. बी. गायकवाड, इंडस्ट्रियल असोसिएशनचे शिवशंकर आंधळकर इत्यादी उद्योजक व अधिकारी उपस्थित होते.

यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले की, सोलापूरमधील ड्रायपोर्ट उद्योग हा अत्यंत महत्त्वाचा असून त्यासाठी एमआयडीसीमध्ये राखीव भूखंड देण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना उद्योग विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच चिंचोली एमआयडीसीसाठी वाढीव 5 एमएलडी पाणी देण्याबाबत महापालिका आयुक्त यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यासाठी महापालिकेला दोन वर्षात 28 कोटी रुपये देण्यात येणार आहेत. त्यापैकी येत्या दोन-चार दिवसात 7 कोटी रुपये दिले जाणार आहेत, अक्कलकोट रोड एमआयडीसीसाठी आवश्यक तेवढा पाण्याचा पुरवठा करण्याबाबतही निर्देश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

उद्योजकांनी अंतर्गत रस्ते, वीज, सांडपाणी तसेच अग्निशमन या समस्यांबाबत मांडलेल्या अडीअडचणी सोडवण्याबाबत संबंधित विभागांना सूचना दिल्या. तसेच जलसंपदा विभाग, महापालिका, प्रदूषण मंडळ, वनविभाग यांची जिल्हाधिकारी यांनी बैठक घेऊन कुंभारी-एमआयडीसी रस्त्याबाबतचा प्रश्न मार्गी लावावा, अशा सूचना उद्योग मंत्री डॉक्टर सामंत यांनी दिल्या. क्लस्टर मानांकनाच्या बाबतीत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांना सूचना देण्यात आल्या. तसेच एमआयडीसीच्या जागेमध्ये भूखंड घेऊन जर कोणी उद्योग सुरू करत नसेल तर ते भूखंड त्यांच्याकडून काढून घ्यावेत, असे निर्देश दिले. एमआयडीसी लगतच्या ग्रामपंचायतींना उद्योजकांच्या करातील 50 टक्के रक्कम ही त्या ग्रामपंचायतीच्या कामासाठी देण्यात येईल. मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी ते काम योग्य असल्याचा दाखला दिल्यानंतरच तेच काम ग्रामपंचायतीने करावे, असे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले. सोलापूरात ड्रायपोर्टसाठी जागेची मागणी होती. त्यामुळे औद्योगिक वसाहतीमध्ये 100 एकर जागा देण्याची आमची तयारी आहे. तसेच औद्योगिक वसाहतीला 5 एमएलडी पाणी देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज सोलापूर येथील उद्योजकांसोबत संवाद साधला. यावेळी उद्योजकांनी आपल्या समस्या आणि अडचणी मंत्री सामंत यांच्यासमोर मांडल्या. उद्योजकांच्या अडचणी सोडवण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.


# Classified - छोटी जाहीरात

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) भागाकारच्या विरूध्दार्थी शब्द २) तलाव, पाण्याचा साठा असलेली जंगलातील जागा ३) वाईट, डावा ४) मनातील उत्साह ५) दात घासण्यासाठी वापरतात ती एक प्रख्यात टूथपेस्ट ६) पतीची आई ८) एक श्वसनरोग १३) पाठीचा कणा याच्या साखळीने बनला आहे १५) मोठा तीळ १६) भाजप पक्षाचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्र्यांचे आडनाव १७) सल उलट लिहा १८) मुलाची मुलगी २०) फोटो (हिंदीत) २१) पुण्यच्या विरूध्दार्थी शब्द २३) पाणी पिण्याची तीव्र इच्छा २४) महाराष्ट्रातील लेण्यांसाठी प्रसिध्द असलेला जिल्हा २६) फळातील गोड द्रव २७) आईची बहीण २८) एक थोर संत ३०) स्वार्थ, हेतू ३२) मदनाची पत्नी ३३) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक ३५) देवतांनी दिलेला आशीर्वाद ३५) मानहानी करणे ३८) व्यायाम, मेहनत ४१) न बोलण्याचे घेतलेले व्रत ४२) पुरूषांच्या ओठावरील केस

**आडवे शब्द :** १) मराठी वर्षाच्या सुरूवातीचा येणारा सण ४) मराठी वर्षातील सुरूवातीचा महिना ५) हा उगळावा तितका काळाच, अशी एक म्हण आहे ७) सहाय्य ९) सब्र का ** मिठा होता है १०) पाठीवर कठीण आवरण असलेला एक उभयचर जीव ११) कबूल, ** असणे १२) खेळ (इंग्रजीत) १४) पक्का, न बदलाणारा निर्णय या अर्थाने १६) छ. शिवरायांच्या पत्नी सईबाई यांचे माहेर १९) तीन आणि चार मिळून होणारी संख्या २१) हरिणाचे पिल्लू २२) पानाचा विडा याच्यामुळे रंगतो २४) शेतीची नांगर, पाभार ही अवजारे (ग्रामीण भाषेत) २५) जळण २८) सात गुणिले तीन २९) उलटी, ओकारी ३१) गाणे गाणारा ३२) रसाळ, रसयुक्त ३५) होडी, नौका ३५) एक म्हण-** तेथे माती ३७) नशीब (इंग्रजीत) ३९) भीतीने थरथरणे, **** उडणे ४०) एसटीची प्रवासी गाडी ४२) गवंडीकाम वा इतर कामातील कुशल कारागीर ४३) ध्येय साध्य करण्यासाठी या गोष्टी पणाला लावाव्या लागतात-** ** ** ४४) राष्ट्रवादीचे एक नेते-*** पवार

## सुडोकु - 02

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | 1 | | | 2 | 8 | | 4 |
| 4 | | 9 | 8 | 3 | 1 | 5 | 2 | |
| | | | | 4 | 9 | 1 | | |
| 1 | | 8 | 3 | 9 | 6 | 4 | | 5 |
| | | 6 | 1 | | | | 8 | |
| | | 3 | 2 | 8 | 4 | 9 | 1 | |
| 6 | | | | | 5 | | | |
| | | | 7 | 6 | | 2 | | |
| 7 | | 4 | | | | | | |

# अकलूज परिसरात बोअरवेलच्या मालकांकडून नागरिकांची लूट

**अकलूज (विलास गायकवाड):-** अकलूज परिसरात काही बोअरवेल मालक यांच्याकडून, नागरिकांची मोठी लूट व फसवणूक होत असून, प्रशासनाने याकडे लक्ष केंद्रित करून, गेले वर्षभरात अकलूजसह, माळशिरस तालुक्यातील घरगुती व शेतीसाठी घेण्यात आलेल्या बोअरवेल, नियमबाह्य पद्धतीने घेण्यात आले आहे का? किंवा नियमांच्या अधीन राहून खोदकाम केले आहे का? याची सखोल चौकशी करण्यात यावी व दोषी आढळल्यास, त्यांचेवरती कठोर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.



पाणी हेच जीवन आहे आणि ते नाही मिळाले तर, मानवी जीवनावर मोठा परिणाम होऊ शकतो? काही प्रमाणात अकलूज मध्ये असाच अनुभव नागरिकांना आला आहे. तत्पूर्वी उन्हाची तीव्रता, पावसाबद्दल हवामान खात्याचा अंदाज,याचा विचार करून, इतरांनाही मोफत पाणी देता येईल आणि स्वत:लाही वापरता येईल म्हणून, अकलूज येथील काही लोकांनी, अकलूज परिसराच्या आसपास, असलेल्या स्वतःच्या मालकीच्या मोकळ्या जागेवर बोअरवेल घेतली. परंतु बोरवेल चालकांकडून, आठशे फुटांच्या पुढे खोदकाम होऊनही, घेण्यात आलेल्या बोअरवेलला पाणी लागले नाही. उलट बोरवेल चालकाने व एजंटने संगनमताने लाखो रुपये उकळण्याचा प्रयत्न केला आहे. सदरची बाब अत्यंत गंभीर असून, माळशिरस तालुक्यात घेण्यात आलेल्या घरगुती व शेती वापरासाठी तसेच सार्वजनिक बोरवेलची चौकशी होणे गरजेचे आहे. अन्यथा सदर बोरवेल चालक-मालक शासनाचे नियम धाब्यावर बसवून जनतेची लूट सुरूच ठेवतील यात शंका नाही असे बोलले जात आहे.

**अकलूजसह माळशिरस तालुक्यातील काही बोरवेल मालकांकडून शासनाच्या नियमांना केराची टोपली दाखवली जात आहे.**

शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवत, अकलूजसह माळशिरस तालुक्यातील, बोरवेल चालक-मालक यांच्याकडून मोठी लूट होत आहे. काही बोरवेल मालकांनी एजंट मार्फत लुटीचा धंदा सुरू केला आहे. असेच काही एजंट, लोकांच्या मजबूरीचा फायदा घेऊन, लूटमार करताना समोर आले आहेत. शिवाय काहीं नागरिकांना बोरवेल बद्दलचे नियम माहित नसतात,चालक मालक आणि एजंट यांनी बोर घेण्याबाबतचे नियम सांगणे गरजेचे असते. परंतु असे न करता, त्यांना अंधारात ठेवून, सातशे आठशे फुटापर्यंत बोर घेऊन, सदर नागरिकाची फसवणूक केली जाते. त्यांच्याकडून दमदाटी करून रक्कम उकळण्याचा प्रयत्न केला जातो.

भारतात किंवा महाराष्ट्रात बोरवेल घेताना, महाराष्ट्र भूजल (विकास आणि व्यवस्थापन) अधिनियम आणि केंद्रीय भूजल प्राधिकरणाचे (CGWA) नियम लागू होतात.

या नियमांनुसार, बोरवेल खोदण्यापूर्वी स्थानिक प्रशासनाची परवानगी आवश्यक असते, पाण्याची योग्य खोली व सुरक्षित अंतराचे निकष पाळणे बंधनकारक आहे.

बोरवेल खोदण्यासाठी, कायदेशीर परवानगी व नोंदणी परवाना व एनओसी आवश्यक आहे. बोरवेल खोदण्याआधी, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण आणि विकास संस्था (GSDA) किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून (उदा. ग्रामपंचायत किंवा महानगरपालिका) परवानगी व 'ना हरकत प्रमाणपत्र' घेणे बंधनकारक आहे. नोंदणीकृत व्यावसायिक, बोरवेलचे काम फक्त GSDA कडे नोंदणीकृत असलेल्या, व्यावसायिकाकडूनच करून घेणे बंधनकारक आहे.

प्रमाणपत्र लावणे, बोरवेल पूर्ण झाल्यावर खोदकाम करणाऱ्या एजन्सीचे प्रमाणपत्र व नोंदणी क्रमांक दर्शनी भागात लावणे आवश्यक असते.

सुरक्षिततेचे नियम, खोलीचे नियमः भूजल पातळी टिकवून ठेवण्यासाठी बोरवेलची खोली साधारणपणे २०० फुटांपेक्षा (६० मीटर) जास्त नसावी, असे काही नियमांत नमूद केले आहे.

विनापरवाना बोरवेल घेतल्यास किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई होऊ शकते.

पहिल्या गुन्ह्यासाठी १०,००० रुपये दंड आणि दुसऱ्या गुन्ह्यास ६ महिने तुरुंगवास किंवा २५,००० रुपये दंड अशी शिक्षेची तरतूद आहे.

# सीना नदीला अखेर पाणी मिळणार

## आ. अभिजीत पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** दुष्काळाच्या छायेत सापडलेल्या माढा तालुक्यासह सीना नदीकाठच्या शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. सीना नदीत तातडीने पाणी सोडण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय प्रक्रिया सुरू केल्याची माहिती समोर आली असून, या निर्णयामागे माढा मतदारसंघाचे आमदार अभिजीत (आबा) पाटील यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनापासून जिल्हा नियोजन समिती (डीपीडीसी) बैठकीपर्यंत केलेल्या सातत्यपूर्ण आणि आक्रमक पाठपुराव्याला यश आल्याचे सांगितले जात आहे.

यंदा अत्यल्प पावसामुळे माढा तालुक्यासह सीना नदी परिसरातील अनेक गावांमध्ये पेरणीनंतर पिकांची वाढ खुंटली आहे. नदी पूर्णपणे कोरडी पडल्याने शेतीसाठी आवश्यक पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर बनला होता. नदीकाठच्या शेतकऱ्यांसमोर उभी पिके वाचविण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर आमदार अभिजीत पाटील यांनी हा प्रश्न शासन दरबारी प्रभावीपणे मांडत सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला.

विधिमंडळाच्या अधिवेशनात त्यांनी सीना नदीतील पाणीप्रश्न वारंवार उपस्थित केला. मुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच जिल्हाधिकाऱ्यांसोबत अनेक बैठका घेऊन सीना नदीत तातडीने पाणी सोडण्याची मागणी त्यांनी केली. उजनी धरणातील पाणीसाठा वाढल्यानंतर माढा तालुक्याचा



हक्काचा पाणीहिस्सा सीना नदीत सोडण्यात यावा, अशी ठाम भूमिका त्यांनी शासनासमोर मांडली.

यासोबतच सीना-माढा उपसा सिंचन योजना, मानेगाव उपसा सिंचन योजना तसेच बोगद्यातून सीना नदीला पाणी उपलब्ध करून देण्याच्या प्रलंबित योजनांनाही गती देण्याची मागणी आमदार पाटील यांनी केली. या योजनांची अंमलबजावणी झाल्यास भविष्यात माढा तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीवर मोठ्या प्रमाणात मात करता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, सीना नदीत पाणी सोडण्याच्या मागणीसाठी गुरुवारी रिधोरे येथे शेतकऱ्यांच्या वतीने रास्ता रोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. या आंदोलनासाठी पोलिसांची आवश्यक परवानगीही घेण्यात आली होती. मात्र शासनाशी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच सीना नदीत लवकरच पाणी सोडण्याबाबत सकारात्मक आश्वासन मिळाल्याने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून आंदोलन तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

याबाबत आमदार अभिजीत पाटील म्हणाले, "लोकप्रतिनिधी म्हणून शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी संघर्ष करणे हे माझे कर्तव्य आहे. टीका करणारे टीका करतील; मात्र मी माझ्या बळीराजाच्या हितासाठी प्रत्येक स्तरावर लढत राहणार आहे. शासनाकडे केलेला प्रत्येक पाठपुरावा, सादर केलेली प्रत्येक मागणी आणि घेतलेली भूमिका जनतेसमोर पारदर्शकपणे मांडली आहे. त्यामुळे अफवा आणि दिशाभूल करणाऱ्या प्रचारावर विश्वास ठेवू नये."

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर भीमा नदीप्रमाणेच सीना नदीतही लवकरच पाणी सोडले जाईल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी मुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री, पालकमंत्री आणि संबंधित अधिकाऱ्यांचे आभार मानले. तसेच "पंढरपूरच्या विठुरायाच्या आणि आई माडेश्वरीच्या कृपेने राज्यात भरपूर पाऊस पडो, उजनी धरण शंभर टक्के भरू दे आणि बळीराजाच्या जीवनात सुख-समृद्धी नांदो," अशी प्रार्थनाही त्यांनी व्यक्त केली.

सीना नदीतील पाणीप्रश्नावर झालेल्या या सकारात्मक घडामोडीमुळे माढा तालुक्यासह नदीकाठच्या गावांतील शेतकऱ्यांमध्ये नव्याने आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनाने जाहीर केलेल्या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी लवकरात लवकर व्हावी आणि नदीत तातडीने पाणी सोडण्यात यावे, अशी अपेक्षा आता परिसरातील हजारो शेतकरी व्यक्त करत आहेत.

# विशाल पांढरे यांची वैज्ञानिक अधिकारी पदावर नियुक्ती

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील पिसेवाडी (वेळापूर) येथील गावचे सुपुत्र विशाल सावळा पांढरे यांची पुणे विभागीय सायबर क्राईम / फोरेन्सिक विभाग (गृह विभाग, महाराष्ट्र शासन) येथे वैज्ञानिक अधिकारी या पदावर नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्र कमांडो फाउंडेशन आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी त्यांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.विशाल हे पिसेवाडी येथील सामाजिक सामाजिक कार्यकर्त्या रंजना सावळा पांढरे यांचे ज्येष्ठ पुत्र आहेत.यापूर्वी ते मुंबई येथील मुख्य कार्यालयात कार्यरत होते.



कॉम्प्युटर सायन्स आणि सायबर लॉचे (शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई) येथे शिक्षण घेतलेल्या विशाल पांढरे यांना सायबर क्राईम क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाचा अनुभव आहे. त्यांनी २०१६ ते २०२१ या काळात नवी दिल्लीच्या विधी विज्ञान प्रयोगशाळेत वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून काम पाहिले आहे. यादरम्यान त्यांनी सीबीआय, एनआयए आणि दिल्ली पोलिसांच्या अनेक क्लिष्ट गुन्ह्यांच्या तपासात सायबर तज्ज्ञ म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. एमपीएससीच्या माध्यमातून २०२१ मध्ये त्यांची महाराष्ट्र शासनाच्या गृहविभागात नियुक्ती झाली. त्यांनी अधिकाऱ्यांना सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन केले आहे.

# सस्टेनेबिलिटी इन लिव्हिंग स्पेसवर प्रमोद चौगुले यांचे प्रेझेंटेशन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बांधकामासाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या विषयावर असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्स सोलापूर व अल्ट्राटेक सिमेंट यांच्या संयुक्त विद्यमानाने हॉटेल फर्न येथे सस्टेंनीबिलिटी इन लिविंग स्पेस या विषयावरती सांगलीचे प्रसिद्ध बांधकाम शास्त्रज्ञ प्रमोद चौगुले यांनी आपले प्रेझेंटेशन दिले.



या कार्यक्रमास अल्ट्राटेक सिमेंटचे झोनल अधिकारी इंजिनिअर अतुल गोड घाटे यांच्यासह असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्स सोलापूर अध्यक्ष बी. एम जाधव उपाध्यक्ष वैभव होमकर सचिव संतोषकुमार बायस, खजिनदार मनोज महेंद्रकर तसेच इंजि. इफ्त्येकार नदाफ हे आवर्जून उपस्थित होते.

यावेळी प्रेझेंटेशन देताना चौगुले म्हणाले की समाजासाठी धरती मातेने दिलेल्या शाश्वत ऊर्जेचा वापर करून, लिविंग स्पेसमध्ये जास्तीत जास्त चांगला उपयोग व्हावा यासाठी आम्ही सदैव प्रयत्न शील राहणार आहोत, यावेळी कार्यक्रमाची प्रस्तावना अध्यक्ष इंजि. भगवान जाधव यांनी केले तर आभार सचिन संतोषकुमार बायस यांनी मानले.

सोलापुरातील सर्व इंजिनिअर्सना उपयुक्त असलेल्या या महत्त्वाच्या कार्यक्रमास असोसिएशनचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. तसेच अल्ट्राटेकचे घोडघोटेसर, दीपक किंगार, चव्हाण, राजेश कांबळे. तसेच अल्ट्राटेकची सर्व टीम हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केला.

# मानाच्या १० पालख्यांसोबतच्या दिंड्यांना प्रति दिंडी २० हजार प्रमाणे २ कोटी ८० लाखांचे अनुदान मंजूर

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री वारकरी महामंडळामार्फत गेल्या दोन वर्षापासून मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या दिंड्यांना देण्यात येणारे अनुदान यावर्षीही निरंतर सुरू ठेवण्यात आले असून विभागीय आयुक्त पुणे तथा व्यवस्थापकीय संचालक, मुख्यमंत्री वारकरी महामंडळ यांच्या देखरेखीखाली या निधीचे थेट बँक खात्यात वाटप सुरू करण्यात आले आहे.



महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत नव्याने स्थापन झालेल्या "मुख्यमंत्री वारकरी महामंडळ" मार्फत तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी एकादशी वारी सन २०२६ करीता मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या दिंड्यांना दिलासा देणारा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. २ जुलै २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार यावर्षी वारीकरीता येणाऱ्या दिंड्यांना प्रत्येकी रु. २० हजार प्रमाणे एकूण रु. २ कोटी ८० लाख रुपये इतके वित्तीय अनुदान वितरित करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची आणि भक्ती मार्गाची शेकडो वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेली आहे. या वारीमध्ये प्रामुख्याने कष्टकरी, शेतकरी आणि कामगार बांधव मोठ्या संख्येने सहभागी होतात. वारकरी बांधवांना सुयोग्य सोयी-सुविधा पुरवणे तसेच वारीचे सूक्ष्म व नेटके नियोजन करणे या हेतूने शासनाने दिंड्यांना अनुदान देण्यास सुरुवात केली आहे.

चालू वर्षामध्ये एकूण १ हजार ४०० दिंड्यांना हे अनुदान वितरित करण्याचे उद्दिष्ट असून, प्राप्त अधिकृत माहितीनुसार सद्यस्थितीत एकूण १ हजार १९९ पात्र दिंड्यांपैकी १ हजार दिंड्यांचे बँक तपशील प्राप्त झाले असून त्यांच्या खात्यात थेट रक्कम वर्ग करण्याची प्रक्रिया गतिमान करण्यात आली आहे. उर्वरित १९९ दिंड्यांच्या बँक खात्यांचे तपशील प्राप्त होताच तात्काळ निधी वर्ग करण्यात येईल. तसेच वारीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ४१ नवीन दिंड्यांच्या बाबतीतही आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यात येत आहे.

ज्या दिंड्यांचे बँक तपशील अद्याप प्राप्त झालेले नाहीत, अशा दिंडी प्रमुखांनी आपले बँक खाते आणि आवश्यक तपशील संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे किंवा विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांच्याकडे त्वरित सादर करावेत, जेणेकरून अनुदानाची रक्कम थेट बँक खात्यात विनाविलंब जमा करता येईल,असे आवाहन मुख्यमंत्री वारकरी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले आहे.

# जिल्ह्यात गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य वाहतुकीवर धडक कारवाई

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य उत्पादन शुल्क विभाग, सोलापूर यांची मा.डॉ. राजेश देशमुख, आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई व सागर धोमकर, विभागीय उपायुक्त, पुणे विभाग यांच्या निदेर्शानुसार श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क सोलापूर व सौरभ वा. अदाटे, उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क सोलापूर यांचे मार्गदर्शनाखाली दि.१२/०७/२०२६ रोजी मौजे. मळोली या गावच्या हद्दीत सांगोला ते इंदापूर रोडवर, साळमुख चौक, मळोली ता. माळशिरस जि. सोलापूर या ठिकाणी गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य वाहतूकीवर केलेल्या थडक कारवाईत एकुण ७०० बॉक्स यामध्ये ७५० मिलीच्या विदेशी मद्याच्या ८४०० बाटल्या एकुण ६३०० ब.लि. गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य, १ चोदा चाकी अशोक लेलँन्ड कंपनीचा ट्रक असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन एकुण १ गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच २ जनांवर कारवाई करुन रु.१,२४,७१,०००/- किमतीचा मुद्येमाल जप्त करण्यात आला



तसेच मागिल आठवडयामध्ये दिनांक ०८/०७/२०२६ रोजी मौजे. सादेपूर ता.दक्षिण सोलापूर जि. सोलापूर या ठिकाणी गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य ७५० मिलीच्या ३६ बाटल्या, बनावट विदेशी मद्य १८० मिलीच्या २८ बाटल्या, ५०० बुचे, १५० रिकाम्या बाटल्या, १ दुचाकी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन एकुण १ गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच १ आरोपी फरार असुन २ जनांवर कारवाई करुन रु.१,२६,४८०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तसेच दिनांक ०८/०७/२०२६ रोजी हत्तुर-कुमठे रोड, हत्तुर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर या ठिकाणी गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य ७५० मिलीच्या १५६ बाटल्या, बनावट विदेशी मद्य १८० मिलीच्या १० बाटल्या, ६०० बुचे, १२७५ रिकाम्या बाटल्या, २ दुचाकी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन एकुण १ गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच ४ जनांवर कारवाई करुन रु.३,६२,६९०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दिनांक ११/०७/२०२६ रोजी मौजे. निजामपूर गावचे हद्दीत ता. सांगोला जि.सोलापूर या ठिकाणी गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य ७५० मिलीच्या १५ बाटल्या, व १८० मिलीच्या १८३ बाटल्या, ७८० बुचे, ३७४० रिकाम्या बाटल्या, असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन एकुण १ गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच ३ आरोपी फरार असुन रु.१,०४,७००/- किमतीचा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

माहे १ एप्रिल २०२६ ते दि.१२ जुलै २०२६ या कालावधीत या कालावधीत सोलापूर शहर व जिल्ह्यात केलेल्या अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रावर/अवैध देशी-विदेशी मद्य / परराज्यातील मद्य /बनावट मद्य निर्मिती विक्री व वाहतुकीवर केलेल्या धडक कारवाईत एकुण ३३३०४० ली. रसायन, २५७४०.५ लि. हातभट्टी दारु, ६९१२.२७ ब.लि. परराज्यातील मद्य, १३०७.४४ ब.लि. देशी मद्य, ४५४.१५ ब.लि. विदेशी मद्य, ४७९.१७ ब.ली. बिअर, ताडी ३७५७ ब.लि. असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एकूण ८७३ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. तसेच एकूण ८९८ जणांवर कारवाई करुन ८३ वाहनासह एकूण रुपये ४,१४,२५,३९१/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाई राज्य उत्पादन शुल्क, विभागाचे निरीक्षक एस. जी. भवड व आर.के.पवार, ए.व्ही. घाटगे, दुय्यम निरीक्षक एस.एस. भोसले, एस.बी. शेळके, एस.एस.शिंदे, ए. आर. नांगरे, सहायक दुय्यम निरीक्षक एस.ए. बिराजदार, जवान पी.डी.पुसावळे, डी.ए.चौधरी, आर.पी. कांबळे, वाय.बी. तोग्गी, व्ही.ए. काळे, टि. एच. जाधव, वाय.ए.पाटील, महिला जवान श्रीमती के.ए. जाधव तसेच जवान-नि-वाहनचालक एम.एस. जडगे व अकार्यकारी घटकावरील अधिकारी / कर्मचारी यांनी पार पाडली आहे.

तसेच अवैध ढाब्यावर मद्य विक्री, अवैध मद्य निर्मिती, वाहतुक, ती जवळ बाळगणे यासाठी वापरण्यात येणा-या जागा मालक यांनाही सदर कारवाईत आरोपी करण्यात येते याची नोंद घ्यावी. मिथेनॉलयुक्त बनावट दारुमुळे पुणे येथील दुर्घटनेत लोकांचे दुदेर्वी मृत्यु झाले आहे. तरी सदर प्रकारच्या विषारी दारु मुळे किडनी निकामी होणे, कामस्वरुपीचा अंधत्व येणे व अकाली मृत्यु असे गंभीर दुष्परिणाम संभवतात, तरी अश्या कुठल्याही अमिषांना बळी न पडण्याचे आव्हान नागरिकांना करण्यात येत आहे.

"आपल्या परिसरात कोठेही अवैध मद्य निर्मिती किंवा विक्री होत असल्यास अथवा मिथेनॉल, क्लोरेल हायड्रेट इत्यादी तत्सम पदार्थ, द्रव्याची निर्मिती, भेसळ, वाहतुक, विक्री होत असल्यास त्याची माहिती टोल फ्री १८००२३३९९९९ क्रमांक अथवा व्हॉटस ॲप क्रमांक ८४२२००११३३ या क्रमांकावर तात्काळ राज्य उत्पादन शुल्क विभागाला द्यावी, माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल, असे श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापुर यांनी सांगुन अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे.

# महापौर कोंड्याल यांची पालखी मार्गाची प्रत्यक्ष पाहणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सालाबादप्रमाणे आषाढी वारीनिमित्त श्री क्षेत्र शेगाव येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या श्री गजानन महाराज पालखी सोहळ्याचे शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी सोलापूर शहरात आगमन होणार असून पालखीचा शहरात दोन दिवस मुक्काम असणार आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने आज महापौर विनायक कोंड्याल यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण पालखी मार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून वारकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या सुविधा आणि आवश्यक तयारीचा आढावा घेण्यात आला.या पाहणी दौऱ्यात स्थायी समिती सभापती सौ. रंजीता चाकोते, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त सौ. वीणा पवार, नगरसेविका वंदना गायकवाड, नगरसेवक गौतम कसबे, नगरसेवक रवी कयावले, नगरसेवक भरतसिंग बडूरवाले, नगरसेविका श्रीदेवी फुलारे, नगरसेविका कल्पना कदम,माजी नगरसेवक दिलीप कोल्हे,नगर अभियंता सारिका आकूलवार, अग्निशमन विभागाचे राकेश साळुंखे, अवचित दुधाळ, श्री गजानन महाराज शेगाव संस्थानचे स्थानिक प्रतिनिधी सुनील कुलकर्णी व सुनील फाळके, उद्यान अधिकारी कोमल काशीद तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.पाहणीची सुरुवात रूपाभवानी पाणी गिरणी चौक येथून करण्यात आली. याच ठिकाणी श्री गजानन महाराजांच्या पालखीचे शहरात आगमन होणार आहे. त्यानंतर तुळजापूर वेस, कस्तुरबा मार्केट, सम्राट चौक, श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर, बाळी वेस, टेलिफोन भवन, कुंभार वेस, करण चौक मार्गे कुचन प्रशाला येथे



पालखीच्या मुक्कामस्थळाची पाहणी करण्यात आली.यावेळी पालखी मार्गावरील स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सार्वजनिक स्वच्छतागृहे, प्रकाश व्यवस्था, आरोग्य सेवा, रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहन व्यवस्था, वाहतूक नियोजन, मुक्कामस्थळी वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा तसेच इतर नागरी सोयी-सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.त्यानंतर वारकऱ्यांच्या मुक्कामासाठी उपलब्ध असलेल्या मंगल कार्यालयांची पाहणी करण्यात आली. पुढे मोदी रेल्वे ब्रिज ते दमाणी नगर या मार्गाचीही पाहणी करून आवश्यक कामांची नोंद घेण्यात आली.यावेळी महापौर विनायक कोंड्याल यांनी संबंधित विभागांना पालखी मार्गावरील सर्व अडथळे तात्काळ दूर करणे, झाडांच्या धोकादायक फांद्यांची छाटणी करणे, रस्त्यांवरील खड्डे त्वरित बुजविणे, स्वच्छता अधिक प्रभावीपणे करणे, प्रकाश व्यवस्था सुरळीत ठेवणे तसेच वारकऱ्यांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. महापौर विनायक कोंड्याल म्हणाले :"श्री गजानन महाराज पालखी सोहळा हा सोलापूरच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. हजारो वारकरी शहरात येत असल्याने त्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी महानगरपालिकेने सर्व विभागांना सज्ज राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. स्वच्छता, पाणी, आरोग्य, प्रकाश व्यवस्था, सुरक्षा आणि इतर सर्व सुविधा दर्जेदार पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे."महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे म्हणाले "पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने सर्व विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, अग्निशमन, प्रकाश व्यवस्था, वाहतूक आणि आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. पालखी मार्गावरील सर्व कामे वेळेत पूर्ण करून वारकऱ्यांना सुरक्षित व सुकर सेवा देण्यासाठी महानगरपालिका प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे."सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने श्री गजानन महाराज पालखी सोहळ्यासाठी आवश्यक सर्व तयारी पूर्ण करण्यात येत असून, पालखी सोहळा सुरळीत, सुरक्षित आणि भक्तिमय वातावरणात पार पडण्यासाठी सर्व विभाग समन्वयाने कार्यरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# ॲड. मिलिंद थोबडे यांचा सोलापूर जिल्हा न्यायालयात भव्य सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा निवडणूक २०२६ मध्ये सलग तिसऱ्यांदा विजय मिळवत ऐतिहासिक हॅटट्रिक साधणारे सोलापूरचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. मिलिंद थोबडे यांचा सोलापूर जिल्हा न्यायालयात उत्साहपूर्ण वातावरणात भव्य सत्कार करण्यात आला.



सोलापूर बार असोसिएशनचे माजी सचिव तथा जिल्हा न्यायालयातील ज्येष्ठ वकील ॲड. श्रीनिवास कटकूर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार सोहळ्यास कायदे क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ॲड. बसवराज सलगर (माजी अध्यक्ष, सोलापूर बार असोसिएशन), ॲड. आकाश आयंची, ॲड. सूरज दुधगुंडी यांच्यासह अनेक वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते. ॲड. श्रीनिवास कटकूर यांच्या हस्ते ॲड. मिलिंद थोबडे यांना शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी ॲड. थोबडे यांच्या सलग तिसऱ्या विजयाबद्दल अभिनंदन करत, हा विजय त्यांच्या न्यायव्यवस्थेतील योगदानाचा, वकिलांच्या प्रश्नांसाठी केलेल्या सातत्यपूर्ण संघषार्चा आणि व्यापक जनसंपर्काचा सन्मान असल्याचे मत व्यक्त केले.

बार कौन्सिलवर सलग तीन वेळा निवडून येणे ही उल्लेखनीय कामगिरी असून, ॲड. मिलिंद थोबडे यांनी वकिलांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने केलेल्या कार्याची ही पोचपावती असल्याचे मत ॲड. श्रीनिवास कटकूर यांनी व्यक्त केले.

ॲड. मिलिंद थोबडे यांच्या ऐतिहासिक विजयामुळे सोलापूर जिल्हा न्यायालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, राज्यभरातील विधिज्ञ आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. उपस्थितांनी त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त करत, बार कौन्सिलच्या माध्यमातून वकिलांच्या हितासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली.